# महाराष्ट्र शासन
## विज्ञान संस्था, नागपूर
### रविंद्रनाथ टागोर मार्ग, सिवील लाईन्स, नागपूर


## संस्थेचे उपहारगृह व मुलांची मेस चालविण्याकरिता निवीदा अर्ज (२०२५-२६)

१. अर्जदाराचे नाव ः ------------------------------------------------------ (अन्न व औषधी विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार)

२. स्थायी पत्ता ः

३. सध्याच्या वास्तव्याचा संपूर्ण पत्ता (पत्रव्यवहारा करिता) ः स्थायी पत्त्याप्रमाणे असल्यास पुन्हा नमूद करू नये.

४. मोबाईल क्रमांक ः

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

❖ **अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट)ः** निविदा अर्ज सादर करतेवेळी रूपये २०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष अर्जासोबत जोडावा. धनाकर्ष "**Director, Institute of Science, Nagpur**" यांचे नावे असावा. धनाकर्षाचा (डिमांड ड्राफ्ट) तपशिल ः

| अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट क्रमांक | बॅंकेचे नाव | डिमांड ड्राफ्टची रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|
| | | २०,०००/-<br>(अक्षरी रूपये वीस हजार मात्र) | |

➢ **उपहारगृहाचे मासिक भाडे (निवीदा रक्कम)ः किमान रक्कम ३००० रूपये मात्र**

------------------------ रूपये (अंकात )

रूपये------------------------------------------------------------------------ (अक्षरी)

निविदाधारकाची सही ः

## हमीपत्र

मासिकभाडे नमूद करताना मी उपहारगृहात व मेससाठी पुरविण्याच्या सुविधा व त्यांचे दर तसेच सुविधेबाबत अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजुन घेतल्या आहेत. याबाबींच्या अधिन राहुन मी उपहारगृह व मुलांची मेस चालविण्यास तयार आहे. जेवण व नाश्ता पुरविण्याच्या सुविधा व त्यांचे दर तसेच अटी व शर्तीचे मी उल्लंघन केल्यास संचालक, विज्ञान संस्था, नागपूर जो निर्णय घेतील तो मला मान्य राहील.

निविदाधारकाची सही ः ------------------------------

**उपहारगृहात पुरविण्याच्या सुविधा व त्यांचे दर ः**

संस्थेच्या उपहारगृहात २०२५-२६ या सत्राकरिता पुरविण्यात येणा-या खाद्यसुविधा व त्यांचे दर खालील तक्त्यात नमूद केले आहेत. या दरापेक्षा **जास्त** किंमतीत खाद्यपदार्थांची विक्री करण्यास निविदाधारकास अनुमती असणार नाही.

| अ.क्र. | खाद्यपदार्थाचे विवरण | प्रती प्लेट दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| | **जेवण** | |
| १* | जेवणाची थाळी **(अनलिमीटेड)**ः<br>गव्हाच्या चपात्या, एक भाजी, तूरडाळीचे वरण,<br>भात, (सलादमधे कांदा/ लिंबू/गाजर/बीट/मुळा इत्यादी) | मासिक दर ः २८०० रूपये प्रतिमाह ः दोन्ही वेळेला जेवण<br>गेस्ट चार्ज (एका थाळीचा)ः ६० रूपये<br>टीफीनः ५ पोळया, भाजी, वरण भात, कांदा, लिंबू |
| | **नाश्ता** | |
| २ | पोहे (१०० ग्रॅम) | २० रूपये |
| ३ | पोहे व उसळ (१५० ग्रॅम) | २५रूपये |
| ४ | उपमा (१०० ग्रॅम) सोवत चटणी व सांबार | २० रूपये |
| ५ | इडली २ नग (१०० ग्रॅम) सोवत चटणी व एक वाटी सांबार | २० रूपये |
| ६ | वडा सांबार २ नग (१०० ग्रॅम) सोवत चटणी | २५ रूपये |
| ७ | अंकुरित उसळ(१५० ग्रॅम) | २० रूपये |
| ८ | मसाला डोसा सोवत चटणी व एक वाटी सांबार | ४० रूपये |
| ९ | साधा डोसा सोवत चटणी व एक वाटी सांबार | ३५ रूपये |
| १० | ऑम्लेट पराठा/ ब्रेड ऑम्लेट (२ अंडी, १ पराठा किंवा २ स्लाईस ब्रेड) | ३५ रूपये |
| ११ | आलू पराठा/ मेथी पराठा (१०० ग्रॅम) | २५ रूपये |
| १२ | उकडलेली अंडी (२ नग) | २५ रूपये |
| १३ | अंकुरित कडधान्याची भेळ (१५० ग्रॅम) | २० रूपये |
| | **पेय** | |
| १४ | चहा (१०० मि.ली.) | ८ रूपये |
| १५ | कॉफी (१०० मि.ली.) | १५ रूपये |
| १६ | दूध (१०० मि.ली.) | १० रूपये |
| १७ | मसाला ताक(२०० मि.ली.) | कमाल किरकोळ मुल्य |
| १८ | सोया मिल्क(२०० मि.ली.) | |
| १९ | लस्सी(२०० मि.ली.) | |
| २० | वटर मिल्क(२०० मि.ली.) | |
| २१ | अमुल कूल(२०० मि.ली.) | |

**१* वसतिगृहातील विद्यार्थ्यांना खानावळ बंधनकारक नसल्यामुळे कंत्राटदाराने आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांशी संपर्क साधुन कॅंटिन मध्ये जेवणाची तथा टिफीन ची व्यवस्था करावी.**

**सूचना** ः विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयाच्या उपहारगृहात मैदयाचे व वेसन पिठाच्या पदार्थ विक्रिस निर्वंध घातलेले आहेत.

**महत्वाचे-** **किमान** निवीदा रक्कम (उपहारगृहाचे भाडे)ः रूपये ३,०००/- रूपये तीन हजार मात्र

- **निवीदा अर्ज कार्यालयात सादर करण्याचा अखेरचा दिनांक व वेळ** ः दिनांक **२४ जानेवारी २०२५,** सायंकाळी ५.०० वाजेपर्यत कार्यालयाच्या आवक जावक विभागात सुट्टीचे दिवस सोडून अर्ज स्विकारण्यात येतील.
- **निवीदा अर्ज उघडण्याचा दिनांक व वेळ ः २७ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता मा.संचालकांच्या कक्षात**

## उपहारगृह कंत्राटदाराकरिता अटी व शर्तीः

निवीदा अर्जात वर दिलेल्या सुचनांव्यतिरिक्त कंत्राटदारास उपहारगृह चालवायचे आहे. या अटी व शर्ती खाली नमुद केलेल्या आहेत.

१. निविदा अर्जात नमूद केल्यानुसार खाद्यपदार्थाच्या दराचा फ्लेक्स लावल्याशिवाय उपहारगृह सुरू करता येणार नाही.

२. कंत्राटदाराने उपहारगृहाचे भाडे नियमितपणे दर महिन्याच्या १ तारखेआधी भरणे अनिवार्य राहील.

३. आलेल्या सर्व निवीदामधून ज्या कंत्राटदाराची निवीदा रक्कम सर्वात जास्त असेल व त्याला उपहारगृह चालविण्या करिता आदेश देण्यात येईल. ऐनवेळी आदेश घेण्यास नकार दिल्यास संबंधिताची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व निविदा रक्कमांच्या नमूद केलेल्या उतरत्या क्रमानुसार पुढील अर्जदारास आदेश देण्यात येतील. आदेश न मिळालेल्या अर्जदारांचे अनामत रक्कमेचे धनाकर्ष आठ दिवसांच्या आत परत करण्यात येतील.

४. उपहारगृहाच्या पाहणीकरिता/तपासणीकरिता संचालकांनी समिती गठित केलेली आहे. ही समिती उपहारगृहास केव्हाही भेट देवू शकते तरी उपहारगृहाच्या कार्याबद्दल सतत दक्षता घ्यावी.

५. निविदा अर्ज उघडण्याची प्रक्रिया अर्जात नमुद केलेल्या दिनांकास वेळेनुसार संचालक कक्षात सूरू होईल. यावेळी अर्जदार किंवा त्याचा प्रतिनिधी यापैकी एक व्यक्ति उपस्थित राहू शकतो.

६. उपहारगृह चालविण्या करिता संस्थेकडून गॅस सिलींडर, फ्रिज किंवा कोणतेही साहित्य दिले जाणार नाही.

७. उपहारगृहात अस्वच्छता दिसून आल्यास संस्थेच्या संचालकांद्वारे दंड ठोठावण्यात येईल.

८. उपहारगृहाबद्दल तक्रारपेटीत जमा झालेल्या तक्रारीवर विज्ञान संस्था प्रशासन जो निर्णय घेईल तो अंतिम राहील.

९. संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांना ताजे व गरम अन्न पदार्थ उपलब्ध करून द्यावे लागतील. शिळे अन्न दिल्याची तक्रार आल्यास शहानिशा करून योग्य निर्णय संस्था प्रशासन घेईल व तो अंतिम राहील.

१०. उपहारगृहात पान, विडी, सिगारेट, गुटखा अथवा खर्रा विक्री व सेवन प्रतिबंधित आहे.

११. विद्यार्थी जास्त वेळ विनाकारण उपहारगृहामधे बसणार नाही व मारामारी व भांडण तंटे करणार नाही याची खबरदारी कंत्राटदारास घ्यायची आहे.

१२. उपहारगृहात बालमजूर वापरता येणार नाही.

१३. उपहारगृहातील कचरा संस्थेच्या परिसरात कुठेही टाकता येणार नाही, या कचऱ्याची रितसर विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१४. उपहारगृहातील खाद्यपदार्थ विक्रिसाठी प्लास्टिक व थर्माकोल प्लेट, चम्मच, कप किंवा इतर साहित्याचा वापर करता येणार नाही.

१५. उपहारगृहातील खाद्यपदार्थ बनविण्याकरिता दर्जेदार साहित्य आणि शुध्द खाद्यतेल वापरण्यात यावे.

१६. उपहारगृहातील खाद्यपदार्थ बनविण्याकरिता इलेक्ट्रिक शेगडी किंवा इंडक्शन स्टोव्ह चा वापर करण्यास बंदी आहे. दुध वगैरे नाशवंत पदार्थ ठेवण्यासाठी २५० लिटर पर्यंतचे फ्रिज वापरता येईल.

१७. उपहारगृह चालविण्याचा कंत्राट आदेश दिनांकापासून १२ महिन्यांचा असेल. सदर आदेश कोणतीही पूर्वसूचना न देता पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार संस्थेच्या संचालकांना आहेत. कंत्राटदाराने सेवा चांगली दिल्यास सदर कंत्राट पुढे चालु ठेवण्याचे अधिकार संस्थेच्या संचालकाना राहतील.

१८. हवाळी व उन्हाळी सुट्टयांच्या कालावधीत मासिक भाडयात सूट देण्यात येईल.

१९. विद्यार्थी आजारी असल्यामुळे किंवा संस्थेच्या कार्यक्रमानिमीत्त (जसे एन.एस.एस.कॅम्प, स्पोर्स्ट टूर्नमेंट इ.) जर मेस मधे जेवण करू शकत नसेल तर त्या दिवसांचे प्रमाणशिर पैसे कापून विद्यार्थ्याकडून महिन्याचा जेवणाचा खर्च घ्यावा लागेल, अशावेळी विद्यार्थ्याने मेस कंत्राटदाराला जेवायला येणार नसल्याची पूर्व सूचना देणे आवश्यक राहील. विद्यार्थ्याला परत मेसमधे जेवण सूरू करताना कंत्राटदारास आजारी असलेल्या तारखांचे डॉक्टरांचे मेडिकल सर्टिफीकेट किंवा संस्थेच्या कार्यक्रमाच्या प्रभारी प्राध्यापकांचे पत्र दाखविणे गरजेचे असेल.

संचालक,
विज्ञान संस्था, नागपूर

**अर्जासोबत जोडायच्या बाबीः**

१. अन्न व औषधी विभागांतर्गत अर्जदाराच्या/ फर्मच्या नावाने नोंदणीची सत्यप्रत

२. रूपये २0,000/- चा धनाकर्ष ः अनामत रक्कम

३. कंत्राटदार यापूर्वी ब्लॅकलिस्ट मधे नसल्याचे किंवा त्याच्या विषयी कोणत्याही तक्रारी नसल्याचे हमीपत्र